# अर्थशास्त्र

## बी.ए. प्रथम वर्ष (सेमिस्टर II)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## वितरणाचे सिद्धांत
## (Theories of Distribution)

भूमी, श्रम, भांडवल व संघटन हे उत्पादनाचे चार घटक आहेत. या चार घटकांच्या सहाय्याने उत्पादनाचे कार्य केले जाते. उत्पादनाच्या प्रक्रियेत ज्या उत्पादन घटकांचा समावेश करण्यात येतो त्या उत्पादन घटकांना त्यांच्या उपयोगाबद्दल मोबदला दिला जातो. या उत्पादन घटकांचा पुरवठा प्रामुख्याने, भूमी मालक, भांडवलदार, श्रमिक व संघटक करतात. या घटकांच्या मालकांना जसे - भूमीच्या मालकाला खंड, श्रमिकाला वेतन किंवा मजुरी, भांडवलदाराला व्याज व संघटकाला नफा दिला जाते. हे उत्पादनाचे घटक एकाच व्यक्तीच्या मालकीची नसतात. त्यामुळे वितरणाची समस्या निर्माण होते. ही समस्या सोडविण्यासाठी वितरणाचे सिद्धांत मांडण्यात आले. प्रा. चॅपमन यांच्या मते, उत्पादन कार्यात सहभाग दिल्याबद्दल उत्पादक घटकांना किंवा त्यांच्या मालकांना उत्पादित धनाचे वाटप करण्याच्या क्रियेला वितरण असे म्हणतात.

राष्ट्रीय उत्पन्नाचे उत्पादनाच्या या घटकांमध्ये कसे वाटप होते, या घटकांचा मोबदला कसा ठरतो. यासाठी वितरणाचे दोन प्रमुख सिद्धांत मांडण्यात आले.

१) वितरणाचा सीमांत उत्पादकता सिद्धांत
२) वितरणाचा आधुनिक सिद्धांत

## १) वितरणाचा सीमांत उत्पादकता सिद्धांत

**(Marginal Produtivity Theory of Distribution)**

उत्पादन घटकांचा मोबदला कसा ठरतो हे सांगणारा हा सिद्धांत जे. बी. क्लार्क, जेव्हन्स, मार्शल, विकस्टीड, वॉलरस इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी प्रतिपादित केला. त्यानंतर श्रीमती जोन रॉबिन्सन व हिक्स इत्यादी अर्थशास्त्रज्ञांनी या सिध्दांताला विकसित करण्याचे कार्य केले.

## सिद्धांताची मांडणी

या सिद्धांतानुसार प्रत्येक घटकाचा मोबदला त्याच्या सीमांत उत्पादकतेनुसार ठरतो.

सीमांत उत्पादकता म्हणजे उत्पादनाच्या शेवटच्या घटकापासून मिळणारी उत्पादकता होय. सीमांत उत्पादकता जास्त असेल तर उत्पादक घटकाला जास्त मोबदला मिळेल आणि सीमांत उत्पादकता कमी असेल तर उत्पादक घटकाला कमी मोबदला मिळेल.

## सीमांत उत्पादकता

“उत्पादनाचे इतर सर्व घटक स्थिर ठेवून एका घटकाच्या परिमाणात एक मात्रेने वाढ केल्यामुळे एकूण उत्पादनात होणारी शुध्द वाढ म्हणजे त्या घटकाची सीमांत उत्पादकता होय.”

सीमांत उत्पादकता काढण्यासाठी पुढील सुत्र वापरण्यात येते.

$$\text{सीमांत उत्पादकता} = \frac{\text{एकूण उत्पादनातील बदल}}{\text{उत्पादन घटकांतील बदल}}$$

## सिद्धांताची गृहीत परिस्थिती

१) बाजारात परिपूर्ण स्पर्धेची परिस्थिती असते.

२) उत्पादनाचे सर्व घटक एकजिनसी असतात.

३) उत्पादनाचे घटक विभाज्य असतात.

४) उद्योगात आऱ्हासी उत्पत्ती नियम लागू होतो.

५) उत्पादनाचे घटक पूर्णपणे गतिशील असतात.

६) प्रत्येक घटकांच्या सीमांत उत्पादकतेचे मापन करता येते

७) उत्पादन घटकात पूर्ण रोजगारीची परिस्थिती आहे.

८) हा सिद्धांत दिर्घकाळात लागू होतो.

९) महत्तम नफा मिळवणे हे संयोजकाचे उद्दिष्ट असते.

## सिद्धांताचे स्पष्टीकरण


भूमी, श्रम, भांडवल व संघटन या उत्पादनाच्या चार घटकांचा उत्पादन कार्यात वापर करतांना उत्पादक त्या घटकाची सीमांत उत्पादकता व त्या घटकाला द्यावा लागणारा मोबदला यांची तुलना करतो.

ज्या उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता ही त्याला द्याव्या लागणाऱ्या मोबदल्यापेक्षा जास्त असते त्या घटकाचा अधिक वापर केला जातो. हा वापर त्या घटकाची सीमांत उत्पादकता त्याच्या मोबदल्या बरोबर होत नाही तोपर्यंत सुरु ठेवतो ज्यावेळी उत्पादक घटकांची सीमांत उत्पदकता ही त्या घटकाच्या मोबदल्याबरोबर होते त्यावेळी त्या घटकाचा अधिक वापर करणे बंद होते. हे पुढील उदाहरणाच्या सहाय्याने स्पष्ट करता येते.

| मजुरांची संख्या | सीमांत उत्पादन | मजुरी |
|---|---|---|
| १ | १०० | ६० |
| २ | ८० | ६० |
| ३ | ६० | ६० |
| ४ | ४० | ६० |
| ५ | २० | ६० |

वरील उदाहरणात पहिल्या मजुरामुळे सीमांत उत्पादन १०० रु. चे होते व त्याला ६० रु. मजुरी दिली जाते. म्हणजे संयोजकाला ४० रु. फायदा होतो. याचप्रमाणे दुसऱ्या मजुरापासून २० रु. फायदा होतो. तिसऱ्या मजुरापासून फायदापण होत नाही व तोटा ही होत नाही. कारण सीमांत उत्पादकता व त्याला द्यावी लागणारी मजुरी ही सारखी आहे. परंतु चौथा मजुर कामावर लावणार नाही कारण तो मजुर कामावर ठेवल्यास उत्पादकाला २० रु. तोटा होईल. त्यामुळे ज्या मजुरांची सीमांत उत्पादकता व मजुरी सारखी आहे तेवढेच मजुर कामावर घेईल.

## आकृतीद्वारे स्पष्टीकरण




आकृतीत 'अक्ष' आसावर मजुरांची संख्या दर्शविली व 'अय' आसावर मजुरी व सीमांत उत्पादकता दर्शविली आहे. सी. उ. हा सीमांत उत्पादकता वक्र आहे. हा वक्र वरुन खाली उतरणारा आहे. आकृतीत 'क' या बिंदूवर सीमांत उत्पादकता व मजुरीदर यात समानता प्रस्थापित झाल्यामुळे ६० रु. मजुरी दर असतांना ३ मजुर कामावर लावले जातील त्यापेक्षा जास्त मजुर कामावर ठेवल्यास उत्पादकाला फायदेशीर राहणार नाही. कारण मजुराची सीमांत उत्पादकता ही त्याला दिल्या जाणाऱ्या मोबदल्या पेक्षा कमी असेल.

थोडक्यात उत्पादक हा ज्या ठिकाणी मजुरांची सीमांत उत्पादकता व त्यांना द्यावा लागणारा मोबदला समान होईल तेवढेच मजुर कामावर ठेवील.

## सिद्धांतावरील आक्षेप

१) बाजारात परिपूर्ण स्पर्धेची परिस्थिती नसते. कारण पूर्ण स्पर्धा ही काल्पनिक स्थिती आहे. बाजारात अपूर्ण स्पर्धा अस्तित्वात असते. त्यामुळे उत्पादन घटकांच्या बाजारात पूर्ण स्पर्धा आढळून येत नाही.

२) उत्पादनाचे घटक एकजिनसी नसतात. कारण उत्पादनाच्या प्रत्येक घटकात विविधता आढळून येते. प्रत्येक मजुराची कार्यक्षमता भिन्न असते.

३) उत्पादनाचे सर्व घटक विभाज्य नसतात. प्रत्येक उत्पादन घटकाचे विभाजन करता येत नाही. उदा. संघटक हा लहान तसेच मोठया उद्योगांसाठी अत्यंत आवश्यक असतो. त्यामुळे उद्योग कितीही लहान असला तरी त्याला एक संघटक आवश्यक असतो.

४) नेहमीच आऱ्हासी उत्पत्तीची स्थिती नसते. उद्योगात नेहमीच आऱ्हासी उत्पत्ती आढळत नाही. परंतु बऱ्याच वेळी वर्धी उत्पत्ती नियम व स्थिर उत्पत्ती नियम अमलांत येतो.

५) सर्व घटक गतिशील नसतात. उत्पादनाचे घटक गतिशील नसतात कारण उत्पादनाचे घटक हे एका उद्योग व्यवसायातून दुसऱ्या उद्योग व्यवसायात जावयास सहजासहजी तयार नसतात.

६) सीमांत उत्पादकतेचे मोजमाप कठीण – वस्तूचे उत्पादन करतांना उत्पादनाच्या चारही घटकांचा एकत्रित वापर करुन केला जातो. त्यामुळे एखाद्या विशिष्ट घटकाच्या परिमाणात एखाद्या मात्रेने वाढ केल्यास उत्पादनात झालेली वाढ की त्या विशिष्ट घटकामुळेच झालेली नसते. कारण वस्तूच्या उत्पादनात भूमी, श्रम, भांडवल, संघटन या सर्व घटकांचा संयुक्त वापर केला जात असतो व त्या सर्व घटकांचा हा एकत्रित परिणाम असतो. त्यामुळे एखाद्या विशिष्ट घटकाच्या सीमांत उत्पादकतेचे मोजमाप करणे कठीण असते.

७) उत्पादन घटकांना पूर्ण रोजगार नसतो. या सिद्धांतात पूर्ण रोजगारीची स्थिती गृहीत धरली आहे. परंतु हे गृहीत बरोबर नाही. कारण अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगाराऐवजी अपूर्ण रोजगारीचीच परिस्थिती दिसून येते.

८) सिद्धांत अल्पकाळात लागू पडत नाही. हा सिद्धांत फक्त दिर्घकाळातच लागू पडतो. कारण दिर्घकालावधीतच उत्पादन घटकांना त्यांच्या सीमांत उत्पादकते इतका मोबदला मिळतो. म्हणून हा सिद्धांत अल्पकाळात लागू पडत नाही.

९) नफा हा मुख्य उद्देश नसतो. संघटक हा बाजारातील वस्तूच्या मागणीत वाढ झाल्यास वस्तूच्या उत्पादनात वाढ करतो. नफा मिळविण्याच्या उद्देशाने उत्पादक घटकांच्या परिमाणात वाढ करत नाही. त्यामुळे उत्पादक हा नफ्याच्या उद्दिष्टाने उत्पादन करीत नाही.

## वितरणाचा आधुनिक सिद्धांत

**(Modern Theory of Distribution)**

वितरणाच्या सीमांत उत्पादकता सिद्धांतामध्ये उत्पादक घटकांच्या केवळ मागणी बाजूचाच विचार करण्यात आला आहे. आणि उत्पादक घटकांच्या पुरवठा बाजूकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे हा दोष दूर करण्यासाठी डॉ. आल्फ्रेड मार्शल यांनी वितरणाचा आधुनिक सिद्धांत मांडला. या सिद्धांतात उत्पादक घटकांच्या मागणी आणि पुरवठा या दोन्ही बाजूंचा विचार करण्यात आला आहे त्यामुळे या सिद्धांतालाच 'वितरणाचा मागणी पुरवठ्याचा सिद्धांत' असेही म्हणतात.

## सिद्धांताची मांडणी

ज्याप्रमाणे कोणत्याही वस्तूची किंमत त्या वस्तूच्या मागणी पुरवठ्याच्या संतुलनाने ठरते त्याचप्रमाणे कोणत्याही उत्पादक घटकाची किंमत त्या घटकाच्या मागणी पुरवठ्याच्या संतुलनाने ठरते.

## गृहीत परिस्थिती

**(Assumptions)**

वितरणाचा आधुनिक सिद्धांत पुढील गृहीत परिस्थितीवर आधारित आहे.

१) उत्पादनाचे घटक एकजिनसी असतात.

२) उत्पादनाचे घटक पूर्ण गतिशील असतात.

३) वस्तू व उत्पादन घटकांच्या बाजारात पूर्ण स्पर्धा असते.

४) उत्पादनाचे घटक विभाज्य असतात.

५) वस्तूंच्या व उत्पादन घटकांच्या बाजारात पूर्ण स्पर्धा आहे.

६) उत्पादन घटकांचा वैकल्पिक व्यय दिलेला आहे.

७) उत्पादन घटकांची मागणी व्युत्पन्न असते.

८) उत्पादन घटकांची सीमांत उत्पादकता मोजता येते.

९) उत्पादनात घटत्या फलाचा नियम आमलात येतो.

## सिद्धांताचे स्पष्टीकरण

वितरणाच्या आधुनिक सिद्धांतानुसार कोणत्याही उत्पादक घटकाची किंमत त्या घटकाच्या मागणी व पुरवठ्याच्या संतुलनाने ठरते. प्रथम उत्पादन घटकाच्या मागणीचा विचार करु.

## उत्पादन घटकांची मागणी

**(Demand of factor's of production)**

वस्तूंमध्ये उपयोगीता असल्यामुळे वस्तूंकरिता असणारी मागणी 'प्रत्यक्ष मागणी' असते. परंतु उत्पादन घटकांकरिता असणारी मागणी अप्रत्यक्ष किंवा व्युत्पन्न असते.

उत्पादन घटकाची मागणी ही त्या उत्पादन घटकाच्या सीमांत उत्पादकतेवर अवलंबून असते. उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता आणि सीमांत व्यय समान होईपर्यंत त्या घटकाची मागणी केली जाते. यापेक्षा जास्त परिमाणाची मागणी केल्यास सीमांत उत्पादकता सीमांत व्ययापेक्षा कमी होऊन उत्पादकाला तोटा सहन करावा लागेल. म्हणून उत्पादक जास्त परिमाणाची मागणी करणार नाही.

## उत्पादक घटकांच्या मागणीला प्रभावित करणारे घटक

### १) वस्तूची मागणी

उत्पादन घटकांची मागणी ही वस्तूंच्या मागणीवर अवलंबून असते. वस्तूंची मागणी वाढल्यास ती वस्तू निर्माण करण्याकरिता लागणाऱ्या घटकांची मागणी वाढते आणि याउलट वस्तूची मागणी घटल्यास उत्पादन घटकांची मागणी कमी होते.

### २) उत्पादन घटकांची सीमांत उत्पादकता

उत्पादन घटकांच्या सीमांत उत्पादकतेवर त्या घटकाची मागणी अवलंबून असते. उत्पादन घटकाची सीमांत उत्पादकता वाढत गेल्यास त्या घटकाची मागणी वाढते. आणि सीमांत उत्पादकता कमी झाल्यास मागणी कमी होते.

### ३) पर्यायी घटकांच्या किमती

पर्यायी उत्पादन घटकांच्या किमतीतील बदलाचा परिणाम त्या उत्पादन घटकाच्या मागणीवर होतो. एका पर्यायी उत्पादक घटकांच्या किमती कायम असतांना दुसऱ्या पर्यायी घटकाच्या किमतीत वाढ झाल्यास विशिष्ट घटकाच्या मागणीत वाढ होते. याउलट एका विशिष्ट उत्पादक घटकाच्या किमतीत वाढ होऊन पर्यायी उत्पादक घटकांच्या किमती स्थिर असतील तर विशिष्ट घटकांची मागणी कमी होऊन पर्यायी घटकांची मागणी वाढते.

## उत्पादक घटकांचा मागणी वक्र

उत्पादन घटकांची किंमत वाढल्यास त्याची मागणी कमी होते व किंमत कमी झाल्यास मागणी वाढते. म्हणून उत्पादक घटकांचा मागणी वक्र वरुन खाली उतरणारा म्हणजेच ऋणात्मक उताराचा असतो.

## उत्पादन घटकांचा पुरवठा

**(Supply of factor's of Production)**

कोणत्याही उत्पादक घटकांचा पुरवठा हा वैकल्पिक व्ययावर अवलंबून असतो. वैकल्पिक व्यय उत्पादक घटकांचा दुसऱ्या एखाद्या कार्याकरीता वापर केला असता मिळणारे उत्पन्न होय. कमीत कमी वैकल्पिक व्ययाइतके उत्पन्न मिळाल्याशिवाय उत्पादन घटकांचा पुरवठा होणार नाही. त्यामुळे कोणत्याही उत्पादन घटकाची पुरवठा किंमत ही त्या उत्पादन घटकाच्या वैकल्पिक व्ययावर अवलंबून असते.


भूमी हा उत्पादनाचा मूलभूत घटक असून तो निसर्गदत्त आहे. भूमीचा पुरवठा स्थिर आहे. परंतु एखाद्या उद्योगाच्या दृष्टीने भूमीचा पुरवठा लवचिक असतो. त्याचप्रमाणे श्रमिकांचा पुरवठा देखील एखाद्या विशिष्ट काळात स्थिर असतो. परंतु एखाद्या उद्योगाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास श्रमाचा पुरवठा लवचिक असतो. तसेच एखाद्या विशिष्ट काळात देशातील भांडवलाचा पुरवठा स्थिर असतो. परंतु उद्योगाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास भांडवलाचा पुरवठा हा व्याजाच्या दरानुसार कमी जास्त होत असतो.

## उत्पादन घटकाचा पुरवठा वक्र

वितरणाच्या सीमांत उत्पादकता सिद्धांतानुसार उत्पादन घटकाचा पुरवठा वक्र हा धनात्मक आकाराचा असतो. कारण उत्पादन घटकांचा पुरवठा हा त्यांना मिळणाऱ्या

मोबदल्यानुसार बदलतो. मोबदला जास्त असेल तर पुरवठा जास्त असतो व मोबदला कमी असेल तर पुरवठा कमी असतो.

**उत्पादन घटकांच्या मागणी पुरवठ्याचे संतुलन (मूल्य निश्चिती)**




**उत्पादन घटकाची मागणी व पुरवठा**

वरील आकृतीत 'अक्ष' अक्षावर उत्पादन घटकांची मागणी व पुरवठा तसेच 'अय' अक्षावर उत्पादन घटकांच्या किमती विचारात घेतल्या आहेत. 'मम' हा उत्पादन घटकांचा मागणी वक्र असून 'पप' हा उत्पादन घटकांचा पुरवठा वक्र आहे. हे दोन्ही वक्र परस्परांना 'स' या बिंदूत स्पर्श करतात. त्यामुळे 'स' हा संतुलन बिंदू होय. 'स' या संतुलन बिंदूवर 'अक' या किमतीला उत्पादन घटकांची मागणी व उत्पादन घटकांचा पुरवठा समान झाला आहे.

समजा किमतीत वाढ होऊन अक$_{२}$ झाली तर उत्पादन घटकांची मागणी 'अब' पेक्षा कमी होऊन 'अब'$_{१}$ होईल व पुरवठा 'अब'$_{२}$ होईल. या ठिकाणी उत्पादन घटकांची मागणी कमी व पुरवठा जास्त असल्यामुळे उत्पादन घटकांची किंमत कमी होईल.

याउलट किमतीत घट होऊन ती 'अक'$_{१}$ झाल्यास उत्पादन घटकांची मागणी 'अब'$_{२}$ इतकी व पुरवठा 'अब'$_{१}$ इतका होईल. या ठिकाणी उत्पादन घटकांची मागणी जास्त व पुरवठा कमी असल्यामुळे उत्पादन घटकांची किंमत वाढेल म्हणून अक हे संतुलन मूल्य होय.

## अपेक्षित प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

१) वितरणाचा सीमांत उत्पादकता सिद्धांत स्पष्ट करा.

२) विरणाचा आधुनिक सिद्धांत स्पष्ट करा.

### लघुत्तरी प्रश्न

१) वितरणाच्या सीमांत उत्पादकता सिद्धांताची गृहीते लिहा.

२) वितरणाच्या आधुनिक सिद्धांताची गृहीते सांगा

३) सीमांत उत्पादकता म्हणजे काय?